दिन विशेष...

१८१८ : सिंहगड किल्ला इंग्रजांनी ताब्यात घेतला.
१९०७ : टाटा आयर्न अँण्ड कंपनीची स्थापना.
१९१९ : रॉलेट अ‍ॅक्ट निषेधार्थ महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाला प्रारंभ केला.
१९५८ : कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीस सुरुवात.
१९८९ : महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा पाटील यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८१,२८७.१९ -९६१.४२ (१.१७%)
डॉलर ₹ ९१.०८

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३३ | १७ |
| दिल्ली | ३१ | १६ |
| मुंबई | ३२ | २१ |
| नागपूर | ३४ | २१ |
| पुणे | ३३ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. १ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक ११० किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

सत्य, करुणा आणि प्रेम हे जीवनाचे तीन महत्वाचे सूत्र आहेत.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:४८ संध्या-६:३२

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६३,३५५/- २,९५,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## अकुलखेडा हादरले...!

# प्रेम प्रकरणातून दुहेरी गोळीबार

## महिलेची हत्या करून प्रियकरानेही संपवले जीवन

**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील अकुलखेडा येथे आज सकाळी घडलेल्या दुहेरी गोळीबाराच्या थरारक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला. सोशल मीडियावरील ओळखीमधून जुळलेल्या प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादातून एका व्यक्तीने विवाहित महिलेची गावठी पिस्तूलातून गोळी झाडून हत्या केली आणि त्यानंतर स्वतः वरही गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या दुर्दैवी प्रकारामुळे गावात भीती व हळहळ व्यक्त केली जात आहे.**



**➤ सोशलमीडियावरुन जुळले सूत**

**अनिता पाटील आणि देवा धनगर यांची ओळख सोशल मीडियाच्या माध्यमातून झाली होती. या ओळखीचे पुढे प्रेमसंबंधात रूपांतर झाले.**

प्राप्त माहितीनुसार, जगदीश काशिनाथ पाटील यांच्या राहत्या घरी त्यांची पत्नी अनिता जगदीश पाटील आणि देवा सुरेश धनगर हे दोघे रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आले. आज सकाळी साडेदहाच्या सुमारास पाटील दाम्पत्याची मुलगी शाळेतून घरी परतली असता तिला घरात हा भीषण प्रकार दिसून आला. दोघेही रक्ताने माखलेले पाहताच तिने हंबरडा फोडत शेजाऱ्यांना माहिती दिली. काही क्षणांतच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली.

प्राथमिक तपासात उघड झाल्यानुसार, अनिता पाटील आणि देवा धनगर यांची ओळख सोशलमीडियाच्या माध्यमातून झाली होती. या ओळखीचे पुढे प्रेमसंबंधात रूपांतर झाले. मात्र, मागील काही दिवसांपासून दोघांमध्ये मतभेद वाढले होते. संबंधित महिलेकडून वेळ दिला जात नसल्याच्या कारणावरून देवा धनगर संतप्त झाल्याचे सांगितले जात आहे. संतापाच्या भरात त्याने अकुलखेडा येथील पाटील यांच्या घरी जाऊन गावठी पिस्तूलातून अनिता पाटील यांच्या डोक्यात गोळी झाडली. त्यानंतर त्याने स्वतःवरही गोळी झाडून जीवन संपवले. घटनास्थळी देवा धनगर यांची दुचाकी आढळून आली असून ती पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अण्णासाहेब घोलप तसेच शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मधुकर सावळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दोघांचेही मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात हलवून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. या घटनेमुळे अकुलखेडा परिसरात एकच खळबळ उडाली असून, प्रेमसंबंधातील तणावाने घेतलेले हे भीषण वळण अनेकांना चटका लावून गेले आहे. पुढील तपास अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मधुकर सावळे करीत आहेत.

## भुसावळ पुन्हा हादरले! सिमेंटच्या कुंडीने ठेचून तरुणाची हत्या

**प्रतिनिधी । भुसावळ**

**गुन्हेगारीसाठी कुप्रसिद्ध असलेले भुसावळ शहर पुन्हा एकदा हादरले आहे. खुनाच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. शहरातील नेब कॉलनी परिसरात मध्यरात्री किरकोळ वादातून एका ४२ वर्षीय तरुणाचा सिमेंटची कुंडी डोक्यात घालून निर्घृण खून करण्यात आला. मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे भुसावळ परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.**

**पिंटू सावकारे यांच्या मृत्यूची बातमी समजताच त्यांच्या नातेवाईकांनी आणि मित्रपरिवाराने रुग्णालयात गर्दी केली होती. मध्यरात्री घडलेल्या या प्रकारामुळे भुसावळमधील गुन्हेगारीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अनिल ऊर्फ पिंटू आत्माराम सावकारे असे मृत तरुणाचे नाव आहे. धक्कादायक असा हा प्रकर शनिवारी मध्यरात्री सुमारे एक वाजेच्या दरम्यान घडला. किरकोळ कारणावरून झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर वादात होत खूनचा प्रकार घडला. आनंद नगरला लागून असलेल्या नेब कॉलनी भागात हा खून झाला.

समोरच्या व्यक्तीने रागाच्या भरात अनिल सावकारे यांच्या डोक्यात सिमेंटची जड कुंडी घातली. यात सावकारे रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. नागरिकांनी त्यांना तातडीने रुग्णालयात हलवले, मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली होती. घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी केदार बारबोले, बाजारपेठ पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. (पान २ वर)

## थोडक्यात

### मार्चमध्ये ११ दिवस बँकांचे कामकाज बंद राहणार

**मुंबई ।** मार्च महिन्यात १, ८, १५, २२ आणि २९ तारखेला मिळून एकूण ५ रविवार येत आहेत. त्यामुळे या तारखांना बँकांना सुट्टी असेल. त्याबरोबरच १४ आणि २८ मार्च या दिवशी दुसरा आणि चौथा शनिवार आल्याने बँकांना सुट्टी असणार आहे. ३ मार्च रोजी महाराष्ट्रामध्ये धुलिवंदनानिमित्त बँकांना सुट्टी असणार आहे, तर १९ मार्च रोजी गुढीपाडव्याला बँकांचे कामकाज बंद राहील. २१ मार्च रोजी रमजान ईदनिमित्त बँका बंद राहतील. २६ मार्च रोजी बँकांना रामनवमीची सुट्टी राहणार आहे.

### शिखर बँक घोटाळ्याप्रकरणी ७० जणांना क्लीनचीट

**पुणे ।** महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळाप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट विशेष न्यायालयाने स्वीकारला आहे. या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, दिवंगत नेते अजित पवार यांच्यासह एकूण ७० जणांना क्लीनचीट मिळाली आहे. तसेच, या क्लोजर रिपोर्टविरोधात अण्णा हजारेंसह अन्य याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या निषेध याचिकाही (प्रोटेस्ट पिटिशन) न्यायालयाने फेटाळल्या आहेत.

### एसटीची स्मार्ट कार्डसाठी महिलांचा सर्वाधिक पुढाकार

**मुंबई ।** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) डिजिटल सेवांच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकले आहे. सवलतधारक प्रवाशांच्या सोयीसाठी आता एसटीने स्मार्ट कार्ड सुरु केले आहे. आठवड्याभरात या उपक्रमांतर्गत एकूण १,००,०२१ प्रवाशांनी NCMC स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. यात महिला सन्मान योजना लाभार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग असून तब्बल ३७,९२७ महिलांनी या आधुनिक सुविधेचा स्वीकार केला आहे.

## मराठी शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या घटली : शिक्षणमंत्री दादा भुसे

**वृत्तसंस्था । मुंबई**

**राज्यातील मराठी शाळांतील विद्यार्थ्यांची दहा वर्षांत घटलेली संख्या, तसेच शिक्षक व कर्मचारी यांचे सेवांतील कमी झालेले प्रमाण याबाबतचा प्रश्न आज मराठी भाषा गौरव दिनीच सभागृहात यावा, हा योग विलक्षण व त्यास शिक्षणमंत्री दादा भुसेंनी विधानसभेत दिलेल उत्तर अजब व चक्रावणारे होते. मंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात अंशत: खरे आहे, असे म्हटल्याने सभागृहाला धक्का बसला आहे.**

शिक्षणमंत्री म्हणाले, २०१२-१३ मध्ये राज्यातील मराठी शाळांत विद्यार्थी संख्या २ कोटी १८ लाख होती. दहा वर्षांनी २०२३-२४ मध्ये मराठी शाळांतील विद्यार्थी संख्या २ कोटी १२ लाखपर्यंत कमी झाली. ही विद्यार्थी संख्या आधार प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर घटल्याचे दिसून आले आहे. ही घट ९ लाख विद्यार्थी इतकी असावी. मराठी शाळांत विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी इयत्ता १ ते ८ वीच्या शाळांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण देण्यात येणार आहे. त्यांना गणवेश, बूट, पाठ्यपुस्तके वेळेत मिळावे, (पान २ वर)

## लाडकी बहीण योजनेच्या पैशांवरून संतापल्या महिला

**वृत्तसंस्था । मुंबई**

**राज्य सरकारने राज्यात महिलांसाठी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना आणली. या लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत राज्यातील महिलांना दरमहिन्याला सरकारकडून १५०० रूपये मानधन दिले जाते. मात्र, या योजनेचा लाभ घेण्याकरिता काही नियम आणि अटीही सरकारकडून ठरून देण्यात आल्या. ज्यावेळी ही योजना आली, त्यावेळी सरकारने महिलांनी केलेल्या अर्जांनुसार, सरसकट अर्ज मंजूर करून लाडकी बहीण योजनेचे पैसे दिले. मात्र, अनेक महिलांनी अर्ज करताना नियम आणि अटी बाजूला सारून अर्ज केले.**



आता महिला व बालकल्याण विभागाकडून अर्जाची छाननी बारीकपणे केली जात आहेत. यासोबतच ईकेवायसीचीही अट ठेवण्यात आली. यादरम्यान केवाएसी करूनही लाडकी बहीण योजनेचे पैसे येत नसल्याची ओरड अनेक महिलांची आहे. ई-केवायसी करूनही लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत नसल्याने जळगावात महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यालयात महिलांनी गोंधळ घातल्याचे बघायला मिळाले. गोंधळ वाढल्याचे पाहून कर्मचाऱ्यांनी महिलांना कार्यालयाबाहेर काढले आणि मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावून घेतल्याचा प्रकार. महिला पैसे न मिळाल्याने गोंधळ घातल होत्या.

दोन तास चाललेल्या या प्रकारानंतर संतप्त महिलांनी स्वतः व्हिडिओ बनवून घेत आपली व्यथा मांडून लक्ष वेधून घेतले. महिलांचे व्हिडिओ सोशल मिडियावर (पान २ वर)

**➤ लाडकी बहीण योजनेचे पैसे येणे बंद झाल्याने महिला संतापल्या**

लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद झाल्याने जिल्हाभरातील वेगवेगळ्या तालुक्यांमधील महिलांनी महिला व बालकल्याण विभागाचे कार्यालय गाठत गोंधळ घातला. कार्यालयात विचारणा करण्यासाठी गेलेल्या महिलांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी अरेरावी केल्याचा आरोप महिलांनी केला आहे.

## ममता बॅनर्जींच्या बालेकिल्ल्यात राजकीय भूकंप!

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

**विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच पश्चिम बंगालमधील हाय-प्रोफाइल भवानीपूर मतदारसंघात मोठ्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विशेष पुनरिक्षण प्रक्रियेनंतर शनिवारी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीतून तब्बल ४७,०९४ मतदारांची नावे वगळण्यात आली असून, यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा हा हक्काचा बालेकिल्ला मानला जात असल्याने या बदलांचा थेट परिणाम आगामी निवडणुकीच्या निकालावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दक्षिण कोलकातामधील भवानीपूर मतदारसंघात नोव्हेंबर २०२५ मध्ये जेव्हा ही प्रक्रिया सुरू झाली, तेव्हा एकूण २,०६,२९५ मतदार होते. मात्र, त्यानंतर डिसेंबरमध्ये प्रसिद्ध झालेल्या पहिल्या मसुद्यात ४४,७८६ नावे बाद करण्यात आली होती. शनिवारी आलेल्या अंतिम (पान २ वर)

## जुन्या वादातून हिंगोण्यात तरुणाची हत्या; चाकूहल्ल्यात तिघे गंभीर

### अल्पवयीनासह सात जणांविरोधात गुन्हा : सर्व संशयीतांना अटक : आरोपीत मुंबई पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचा समावेश

**प्रतिनिधी । यावल**

**भुसावळात मित्रांच्या भांडणातून एकाचा खून झाल्याची घटना ताजी असतानाच यावल तालुक्यातूनही खुनाची घटना समोर आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. यावल तालुक्यातील हिंगोणा येथे किरकोळ वादातून एका १९ वर्षीय तरुणाची लाठ्या-काठ्या चाकूने भोसकून हत्या करण्यात आली तर आरोपींच्या हल्ल्यात तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. प्रथमेश मुकेश महाले (१९, हिंगोणा, ता.यावल) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे.**



सात आरोपींनी केलेल्या हल्ल्यात रीना मोहित गजरे (१९), मोहित राजेंद्र गजरे (३०), निखील राजेंद्र गजरे (२६) हे तिघेही जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**पोलिस कर्मचाऱ्यांसह सात संशयीतांविरोधात गुन्हा**

तरुणाच्या खून प्रकरणी रीना रोहित गजरे (१९) यांच्या तक्रारीवरून संशयित अल्पवयीनासह सुधीर रमेश तायडे, मनोज सुधीर तायडे, सचिन सुधीर तायडे, आरती सचिन तायडे, मंगलाबाई सुधीर तायडे (रा. हिंगोणा, ता.यावल), निखील संजय तायडे (रा.मारुळ, ता.यावल) यांच्याविरोधात फैजपूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपींमध्ये मनोज सुधीर तायडे या मुंबई पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

**अधिकाऱ्यांची धाव, सहा आरोपींना अटक**

खुनाच्या घटनेनंतर डीवायएसपी अनिल बडगुजर, निंभोरा सहाय्यक निरीक्षक मीरा देशमुख व कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. खून प्रकरणी एका अल्पवयीन विधी संघर्षीत बालकासह सर्व सहा संशयीतांना पोलिसांनी अटक केली आहे. हिंगोणा गावात पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे.

## इस्रायलचा इराणच्या राजधानीवर हल्ला; नागरिकांचा आक्रोश

**वृत्तसंस्था । नवीदिल्ली**

**मध्यपूर्वेत तणाव शिगेला पोहोचला असून अमेरिका आणि इस्रायल यांनी शनिवारी सकाळी इराण मधील सुमारे ३० ठिकाणांवर समन्वित हल्ले केल्याची माहिती समोर आली आहे. इराणला अण्वस्त्रधारी राष्ट्र होऊ देणार नाही, असा इशारा देत डोनाल्ड ट्रम्प यांनी कठोर भूमिका जाहीर केली.**

या कारवाईनंतर इराणनेही आक्रमक पवित्रा घेत इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ले सुरू केल्याचे वृत्त आहे. तसेच आखाती देशांतील अमेरिकन तळांना लक्ष्य करत इराणने बहरीन, कतार, सौदी अरेबिया आणि कुवैतमधील ठिकाणांवर हल्ले चढवले. विशेषतः बहरीनमधील अमेरिकेच्या जुफैर लष्करी तळावर हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर काही आखाती देशांनी आपली हवाई हद्द तात्पुरती बंद केली आहे. इराणकडून या प्रत्युत्तरात्मक कारवाईत अमेरिकन लष्करी तळांना (पान २ वर)

# ट्रॉफीचा अख्खा इतिहास-भूगोल बदलला

## • कर्नाटकला नमवून जम्मू-काश्मीर पहिल्यांदाच 'चॅम्पियन'; सुवर्ण अक्षरांत नोंद

**वृत्तसंस्था । हुबळी**

**भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये आज एका नव्या अध्यायाची सुवर्ण अक्षरांत नोंद झाली. रणजी ट्रॉफी २०२५-२६ च्या रोमहर्षक अंतिम सामन्यात जम्मू आणि काश्मीरने बलाढ्य कर्नाटक संघावर मात करत पहिल्यांदाच रणजी चषकावर आपले नाव कोरले आहे. विशेष म्हणजे, अंतिम फेरीत पोहोचण्याची ही जम्मू-काश्मीरची पहिलीच वेळ होती आणि पहिल्याच प्रयत्नात त्यांनी विजेतेपदाला गवसणी घातली. पाचव्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर कर्णधार पारस डोग्राने आपला डाव घोषित केला आणि नियमांनुसार संघाला विजयी घोषित करण्यात आले.**



हुबळी येथे खेळल्या गेलेल्या या अंतिम सामन्यात जम्मू-काश्मीरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५८४ धावांचा अवाढव्य डोंगर उभा केला होता. प्रत्युत्तरात कर्नाटकचा पहिला डाव केवळ २९३ धावांवर आटोपला. नियमानुसार, रणजी ट्रॉफीचा अंतिम सामना अनिर्णित राहिल्यास पहिल्या डावात आघाडी घेणाऱ्या संघाला विजेता घोषित केले जाते. जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात २९१ धावांची मोठी आघाडी घेतल्यामुळे त्यांचा विजय निश्चित झाला होता.

कसोटी क्रिकेटमध्ये ५ दिवस खेळूनही निकाल लागला नाही तर तो सामना ड्रॉ मानला जातो, पण फायनलमध्ये एकाला तरी विजेता घोषित करणं गरजेचं असतं. रणजी ट्रॉफीच्या नियमानुसार, जर ५ दिवसांचा खेळ संपल्यानंतरही सामन्याचा निकाल लागला नाही, तर ज्या संघाने पहिल्या डावात जास्त धावा केल्या असतात, त्या संघाला विजयी घोषित केले जाते. येथे जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात मोठी आघाडी घेतली होती, त्यामुळे सामना ड्रॉ होऊनही नियमांच्या आधारे रणजी ट्रॉफीवर जम्मू-काश्मीर संघाच नाव कोरलं गेलं. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय (पान २ वर)

### • औकिब नबी ठरला 'हिरो'



**पहिल्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या कर्नाटकच्या संघाची सुरुवात अत्यंत निराशाजनक ठरली. जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज औकिब नबीने अचूक मारा करत कर्नाटकच्या वरच्या फळीची अक्षरशः कंबर मोडली. स्टार फलंदाज केएल राहुल (१३) याला माघारी धाडल्यानंतर त्याने करुण नायर आणि स्मरण आर यांनाही खाते न उघडताच पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.**

## संपादकीय

### केजरीवालांना लाइफलाइन

राजधानी दिल्लीत शुक्रवारचा दिवस खळबळजनक ठरला. पाच वर्षांपासून सुरू असलेल्या राजकीय आणि कायदेशीर संघर्षाचा न्यायालयाने सोक्षमोक्ष लावला. दिल्लीतील कथित दारू घोटाळ्यात न्यायालयाने तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची मुक्तता केली. या घोटाळ्याने आम आदमी पार्टी आणि या पक्षाचे प्रमुख नेते गोत्यात आले होते. त्यांना तुरुंगात जावे लागले. त्यात केजरीवाल आणि त्यांचे सहकारी मनीष सिसोदिया यांचाही समावेश होता. दिल्लीतील तो काळ एका प्रचंड धक्कादायक वळणे घेणाऱ्या हिंदी चित्रपटाच्या कथानकासारखा होता. भ्रष्टाचाराच्या विरोधातील आंदोलनातून निर्माण झालेला पक्षच भ्रष्टाचाराच्या गाळात रुतला असल्याचे चित्र निर्माण झाले होते. दारू घोटाळ्याने केजरीवालांना बदनाम केले. त्यांनी दशकभरात राजकीयदृष्ट्या जे काही कमावले होते ते सगळे त्यांच्या हातातून निसटले. त्यांच्या पक्षाची पाळेमुळे हादरली. न्यायालयाच्या निकालामुळे केजरीवालांना दुसरा चान्स मिळाला आहे. केंद्रीय तपास संस्थांनी जरी केजरीवालांच्या विरोधात वरच्या न्यायालयात लढण्याची तयारी केली तरी मधला वेळ केजरीवालांना आपले बस्तान पुन्हा बसवण्यासाठी पुरेसा आहे. ते आपण कसे पीडित आहोत हे जगाला ओरडून सांगतील व दिल्लीत पुन्हा ग्रँड एन्ट्री करण्यापासून कोणाला त्यांना रोखताही येणार नाही. तथापि, या प्रकरणात काही महत्त्वाचे प्रश्नही आहेत. ही सुटका निवडणुकीच्या राजकारणाचा परिपाक असल्याचे काँग्रेसने सूचित केले आहे. ते खरे असावे का? तसेच दुसरा प्रश्न असा की एवढा गाजावाजा झालेले हे प्रकरण खरेच घोटाळा होता की काटा काढण्याचा प्रकार होता? दिल्ली दारू घोटाळा जेव्हा अगदी सुरुवातीला चर्चेला आला तेव्हा शेकडो-हजारो कोटींची गडबड झाली असल्याचे आरोप झाले. सरकारी तिजोरीचे तब्बल ५८० कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे तत्कालीन नायब राज्यपालांना सादर केलेल्या अहवालातच म्हटले होते. अहवालाचा सार असा होता की दिल्ली सरकारने असे धोरण तयार केले आहे की त्याचा उद्देश दारू व्यावसायिकांना किमान १२ टक्के नफा व्हावा हे निश्चित करणे होता. त्याबद्दल तब्बल शंभर कोटींची लाच घेतली गेली. यातील ४५ कोटी रुपये गोवा राज्याच्या विधानसभा निवडणुकीसाठी खर्च केला गेल्याचा दावा ईडीने केला होता. आपचे प्रमुख तीन चेहरे केजरीवाल, सिसोदिया आणि राज्यसभा सदस्य संजय सिंह या तिघांना अनुक्रमे सहा महिने, सतरा महिने आणि ६ महिने तुरुंगात काढावे लागले. एकीकडे ही कायदेशीर लढाई सुरू असताना बाहेर राजकीय लढाईही सुरू होती. त्यात भ्रष्टाचाराच्या विरोधात दिल्लीकरांच्या आशेचा अखेरचा किरण अशी प्रतिमा तयार झालेल्या आम आदमी पक्षाची वाताहत झाली. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसशी हातमिळवणी करूनही या दोन्ही पक्षांना भोपळाच हाती आला. विधानसभेतही भारतीय जनता पार्टीला दिल्लीत पूर्वी कधीच मिळाले नव्हते असे यश मिळाले. केजरीवालांना सत्तेबाहेर जावे लागले आणि नंतर ते राजकीय वनवासातच होते. त्यांनी स्वेच्छेने दिल्लीतून बाहेर पडत पंजाबचा रस्ता धरला होता. दिल्लीच्या अण्णा आंदोलनापासून केजरीवालांचा राजकीय आलेख सतत चढताच राहिला. योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, कुमार विश्वास असे अनेक महत्त्वाचे सहकारी त्यांच्यापासून दूर जात राहिले तरी त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली नाही.

# पाणीटंचाईविरोधात युवा क्रांती सामाजिक संघटनेचा इशारा

## वडफळ्या-रोषमाळसाठी तात्काळ उपाययोजनेची निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**युवा क्रांती सामाजिक संघटना, नंदुरबार यांच्या नेतृत्वाखाली नगरपंचायत हद्दीतील वडफळ्या-रोषमाळ येथील वार्ड क्रमांक ८ मधील महिला व युवक वर्गाने तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर आज नगरपंचायत कार्यालय, धडगाव येथे निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.**



वार्ड क्र. ८ मध्ये गेल्या काही दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने महिलांना पहाटेपासून पाण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहेत. अनेक ठिकाणी दोन-दोन दिवस नळ कोरडे राहत असून टँकरची सुविधा अपुरी व अनियमित असल्याची तक्रार करण्यात आली आहे. परिणामी घरगुती कामकाज, लहान मुलांचे संगोपन तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. पाण्यासाठी दूरवर जावे लागत असल्याने महिलांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन सादर करताना तालुका अध्यक्ष लक्ष्मण पाडवी, प्रदेश संघटक मंगेश वळवी, जिल्हा संपर्क प्रमुख शामू पराडके, तालुका संघटक रवींद्र वळवी यांच्यासह वार्ड क्रमांक ८ मधील महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा क्रांती सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क असल्याचे सांगत प्रशासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी दिला.



नगरपंचायत प्रशासनाकडून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. मात्र, पुढील सहा दिवसांच्या आत नियमित व सुरळीत पाणीपुरवठ्याची व्यवस्था न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात महिलांसह मोठ्या संख्येने निवेदन देण्यात येईल, अशी ठाम भूमिका नागरिकांनी मांडली आहे. सध्या या प्रश्नाची परिसरात तीव्र चर्चा सुरू असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

## घटनेकडे डोळस वृत्तीने बघा म्हणजे कारण समजेल : रवींद्र चौधरी

प्रतिनिधी । वरणगाव

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त महात्मा गांधी विद्यालय येथे आयोजित कार्यक्रमात नवजीवन माध्यमिक विद्यालय पाचोरा येथील विज्ञान शिक्षक रवींद्र चौधरी यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले. आपण २१ व्या शतकात तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करत असताना आजही अनेक जण अंधश्रद्धांवर विश्वास ठेवतात. हातचलाखी आणि विविध रसायनांचा वापर करून लोकांची फसवणूक केली जाते. मात्र, कोणत्याही घटनेकडे डोळस वृत्तीने पाहिल्यास त्यामागील विज्ञान समजते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट विज्ञान शिक्षक सुनील वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



कार्यक्रमाला प्राचार्य सी.जे.तायडे, उपप्राचार्य पी. एस. पाटील, उपमुख्याध्यापक बी.एम.राठोड, पर्यवेक्षक डी.आर.कोळंबे, पी.एस.झोपे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात बी.एम.राठोड यांनी विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात विज्ञानाचा उपयोग करून का, कसे आणि कुठे या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर रवींद्र चौधरी यांनी बिना तेलाचा दिवा पेटवणे, जिभेतून तार आरपार करणे, बुका व तेलापासून अग्नी निर्माण करणे, नारळातून काळी रिबीन काढणे, पांढरे पाणी रंगीत करणे अशा विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यामागील वैज्ञानिक कारणे स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वाय. आर. पाटील यांनी केले.

## वरणगाव नगरपरिषदेचा ३६ कोटींचा शिल्लकीचा अर्थसंकल्प

प्रतिनिधी । वरणगाव




**सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वरणगाव नगरपरिषदेचा ३६ कोटी इतक्या रकमेचा व २९,३३,६५५ शिल्लकेचा अर्थसंकल्प (दि. २७) सभागृहासमोर सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आला. शिल्लकीचा अर्थसंकल्प सादर केल्याने वरणगाव शहराच्या विकासाला नवी चालना मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.**

श्री नागेश्वर पर्यटनसाठी विविध सोयीसुविधांसाठी इतिहासात पहिल्यांदा शासनाच्या अनुदान योजनेतून १ कोटींची तरतूद करण्यात आली व महिला आणि बालकल्याण विकास निधी तसेस दिव्यांग कल्याण निधी यासाठी ५ टक्केवरून वाढून ७ टक्केची तरतूद करण्यात आली. तसेच सुवर्ण जयंती नगरोत्थान राज्यस्तर योजना अंतर्गत वरणगाव शहर मल निस्सारण प्रकल्प तथा भुयारी गटार योजनेकरिता ८४ कोटी, वरणगाव शहर रस्ते विकास अनुदान ५ कोटी, भोगावती नदी तट संवर्धन प्रकल्प अहवाला करिता ०.७ कोटींची तरतूद करण्यात आली असून या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही करवाढ व दरवाढ करण्यात आलेली नाही. सुमारे १ ते २ कोटी रुपये इतके देणे बाकी असूनही हा अर्थसंकल्प वरणगाव शहराच्या सर्वांगीण

### विकासाला मिळणार चालना; दिव्यांगचा ५ टक्के निधीवरून ७ टक्के वाढवला

विकासासाठी आणि मूलभूत सोयीसुविधासाठी सक्षम ठरवू,असा विश्वास नगराध्यक्ष सुनिल काळे यांनी व्यक्त केला. अर्थसंकल्पीय बैठकीस लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनिल काळे अध्यक्षस्थानी होते. उपनगराध्यक्ष अरूणाबाई इंगळे, भाजप गटनेते दीपाली माळी, शिवसेना गटनेता तृप्ता महाजन, जेष्ठ नगरसेवक राजेंद्र चौधरी यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष सुनिल काळे यांनी करवाढ न करता विकासकामांना गती देणे आणि पालिकेला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे, असे स्पष्ट केले. मुख्याधिकारी रविंद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली लेखापाल संतोष गुजरे कार्यालयीन अधीक्षक रशिद नौरंगाबादी यांनी अंदाजपत्रक तयार करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. पालिकेची आर्थिक स्वयंपूर्णत: साधण्यासाठी नवीन उत्पन्न स्त्रोत निर्माण करणे, अनावश्यक खर्चात कपात करणे व काटकसरीची अंमलबजावणी करणे तसेच नगरपरिषदेच्या उत्पन्न वाढ यावर सभेत चर्चा झाली.

## पान १ वरुन

**भुसावळ पुन्हा हादरले!......**

पथकाने घटनास्थळाचा पंचनामा केला. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली असून संशयितांच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. रात्री उशिरापर्यंत बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते.

**लाडकी बहीण योजनेच्या......**

व्हायरल झाले आहेत. मात्र, महिलांचा गोंधळ अधिक वाढल्याचे लक्षात येताच कर्मचाऱ्यांनी महिलांना कार्यालयाच्या बाहेर काढून थेट कुलूप लावले. यानंतर महिला या अधिकच संतापल्याचे बघायला मिळाले. ईकेवायसी करूनही लाडकी बहीण योजनेचे हप्ते मिळत नसल्याची ओरड गेल्या काही महिन्यांपासून महिलांची आहे.

**इस्रायलचा इराणच्या राजधानीवर......**

लक्ष्य करण्यात आल्याने संघर्षाचा विस्तार पाच देशांपर्यंत झाल्याचे दिसत आहे. अमेरिकेचा मोठा नौदल तळ बहरीनमध्ये असल्याने त्या परिसरात तणाव अधिक वाढला आहे. दरम्यान, भारत सरकारने संबंधित देशांमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. अलीकडेच भारताचे पंतप्रधान इस्रायल दौऱ्यावर गेले होते, त्यामुळे या घडामोडींमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे. इराणकडून सुरू असलेल्या कारवायांमुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिक चिघळण्याची चिन्हे आहेत. या संघर्षाचे पडसाद जागतिक पातळीवर उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, पुढील काही दिवस अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

**ममता बॅनर्जींच्या बालेकिल्ल्यात......**

अहवालात आणखी २,३२४ नावांची भर पडल्याने एकूण वगळण्यात आलेल्या मतदारांचा आकडा ४७ हजारांच्या पार गेला आहे. विशेष म्हणजे, ममता बॅनर्जी यांनी २०२१ च्या पोटनिवडणुकीत ज्या ५८,००० मताधिक्याने विजय मिळवला होता, त्या तुलनेत ही घटलेली मतदार संख्या अत्यंत निर्णायक ठरू शकते. याव्यतिरिक्त, सुमारे १४,१५४ मतदारांची नावे सध्या अधिनिर्णय प्रवर्गात ठेवण्यात आली आहेत. त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी अद्याप सुरू असून, जर ही नावेदेखील बाद झाली, तर भवानीपूरच्या मतदारांच्या संख्येत मोठी घट पाहायला मिळेल. निवडणूक आयोगाच्या या पावलामुळे सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि विरोधी पक्ष भाजप यांच्यात आतापासूनच शाब्दिक युद्ध रंगात आले आहे.

**ट्रॉफीचा अख्खा इतिहास......**

घेतलेल्या जम्मू-काश्मीर संघाने पहिल्या डावात तब्बल ५८४ धावा करत प्रतिस्पर्ध्यांपुढे मोठे आव्हान उभे केले. दुसऱ्या विकेटसाठी शुभम पुंडीर आणि यावर हसन यांनी १३९ धावांची भागीदारी करत संघाचा पाया मजबूत केला. यावर ८८ धावांवर बाद झाला, पण त्यानंतर शुभमने अब्दुल समदच्या साथीने चौथ्या विकेटसाठी आणखी १२४ धावा जोडल्या. शुभम पुंडीरने १४ चौकारांसह शानदार १२१ धावांची खेळी साकारली, तर अब्दुल समदने ६१ धावांचे मोलाचे योगदान दिले. दुसऱ्या डावात जम्मू आणि काश्मीरकडून कामरान इक्बाल आणि साहिल लोत्रा यांनी शतके झळकावली. यावर हसन १ धावांवर बाद झाला होता, परंतु सलामीवीर कामराननने डाव सावरला. दुसऱ्या डावात जम्मू आणि काश्मीरने ४ बाद ३४२ धावा केल्या. कामराननने नाबाद १६० धावा केल्या, तर साहिलने नाबाद १०१ धावा केल्या. पाचव्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर कर्णधार पारस डोग्राने आपला डाव घोषित केला आणि नियमांनुसार संघाला विजयी घोषित करण्यात आले.

**मराठी शाळांतील विद्यार्थ्यांची......**

अशी योजना आखण्यात आली. काही शाळांमध्ये लेखन, वाचन आणि गणित या विषयांत पिछाडीवर असलेल्या विद्यार्थ्यांना पुढे आणण्यासाठी त्यांना अधिकचे वर्ग घेऊन शिकविण्यात येईल. विद्यार्थ्यांचे आरोग्य पडताळणी करून त्यांना हेल्थकार्ड देण्यात येणार आहे. शाळांमध्ये शुद्ध पाणी, स्वच्छ प्रसाधनगृहे, शाळांची चांगली इमारत या सुविधाही देण्यात येतील, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी काँग्रेस सदस्य अमित देशमुख यांनी सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. शिक्षणमंत्री भुसेंनी सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य असल्याचे सांगितले. अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये मराठीचे शिक्षण देण्यासाठी मराठी भाषिक शिक्षकांचीच नियुक्ती केली जाईल. वर्ष २०२६-२७ पर्यंत मराठी शाळांतील पटसंख्या २५ टक्क्याने वाढवण्याचे लक्ष्य आहे. खासगी शाळा आणि शिकवणीवर्ग यांचे शुल्क निश्चित करण्यासाठी अभ्यासपूर्ण धोरणही निश्चित केले जाणार आहे. भविष्यात याविषयी कायदा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

## हमीभावाने चना खरेदीसाठी आजपासून नोंदणी सुरु

प्रतिनिधी । धुळे

**हंगाम २०२५-२०२६ साठी धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी नाफेडच्यावतीने चना खरेदीसाठी शेतकरी नोंदणी सुरु झाली आहे, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी आर. एस. इंगळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

हमीभावाने चना खरेदीसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाच्या माग्रदर्शक सूचनेनुसार शेतकरी नोंदणी करीता १ मार्च ते ३१ मार्च, २०२६ पर्यंत कालावधी दिला आहे. त्यासाठी पणन महासंघाचे ७ खरेदी केंद्र मंजुर झाले आहेत. शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी ऑनलाईन पिकपेरा असलेला सातबारा, ८-अ, आधारकार्ड, तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक घेवून तालुक्यातील खालील खरेदी केंद्रावर नोंदणी करावी. नोंदणी करतांना पीओएस मशिन (बायोमेट्रिक) आणि फेस ऑथेंटिकेशनचा वापर शासनाकडून अनिवार्य करण्यात आला आहे. यासाठी शेतकऱ्यांनी स्वत: उपस्थित असणे आवश्यक आहे. असे आहे नोंदणीचे ठिकाण धुळे सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रिया सोसायटी धुळे (९९७५८३३७०७), शिरपूर तालुका सहकारी खरेदी विक्री सोसायटी शिरपुर,जि.धुळे (९४२२१२३९२९), शिंदखेडा तालुका शेतकरी सहकारी संघ दोंडाईचा,ता.शिंदखेडा, जि. धुळे शेतकरी सहकारी संघ लि. साक्री, ता. साक्री, जि.धुळे, इंडिया अ‍ॅग्रो फार्मर्स को-ऑप सोसायटी शिंगावे, ता. शिरपूर, जि. धुळे, शेतकरी सहकारी संघ लि. नंदुरबार, ता. जि.नंदुरबार, शहादा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. शहादा, ता. शहादा, जि. नंदुरबार या खरेदी केंद्रावर चना खरेदीकरिता नोंदणी करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी इंगळे यांनी केले.

## धुळे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा आयुक्तांकडून सन्मान

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्विरित्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली असून या निमित्ताने त्यांचा सन्मान व्हावा व त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरित करावे, यासाठी आजचा हा सन्मान सोहळा आयोजित केला असून यानिमित्ताने सर्वांचे अभिनंदन करुन शुभेच्छा व्यक्त करतो, असे प्रतिपादन मनपा आयुक्त नितीन कापडणीस यांनी आज रोजी झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सन्मान सोहळयाप्रसंगी केले.**



धुळे महानगरपालिका स्व. अटलबिहारी वाजपेयी सभागृहात या देखण्या कार्यक्रमाचे आयोजन दि. २७ रोजी आयुक्त नितीन कापडणीस यांच्या संकल्पनेतून करण्यात आलेले होते. या कार्यक्रमास अतिरीक्त आयुक्त करुणा डहाळे, मुख्य लेखा परिक्षक शाहिद शेख, उपायुक्त मनोज वाघ, शहरअभियंता चंद्रकांत उगले, उपअभियंता एन.के. बागुल, शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी विश्वंभर दासरवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ नुकतीच पार पडली. या निवडणुकीत मनपा अधिकारी कर्मचारी, मनपा शिक्षण मंडळाकडील सर्व शिक्षक, तसेच खाजगी शाळा, महाविद्यालयातील शिक्षक तसेच विद्यार्थी विद्यार्थीनी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निवडणूक कामकाज अत्यंत काटेकोरपणे, वेळेत व सुरळीत योग्य पध्दतीने पार पाडली. त्याअनुषंगाने मनपा आयुक्त यांच्या हस्ते निवडणूकीत योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार आज रोजी महानगरपालिकेत अटल बिहारी वाजपेयी सभागृह येथे पार पडला. जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी मनपा शाळा तसेच खाजगी शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यासमवेत मतदान जनजागृती होणेकामी विविध उपक्रम हाती घेतले होते. तसेच या मतदान जनजागृती कार्यक्रमात शहरातील सर्व महाविद्यालयांनी देखील विविध उपक्रम राबवुन आपला सहभाग नोंदवला होता. यामधील सर्व सहभागी अधिकारी कर्मचारी तसेच शालेय व महाविद्यालयीन संस्था विद्यार्थी, विद्यार्थींनी व सामाजिक संघटनातील प्रतिनीधींचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अति. आयुक्त करुणा डहाळे यांनी केले. सूत्रसंचालन वाहिद अली यांनी केले. या कार्यक्रमास उपमुख्य लेखा परिक्षक सुनिलकुमार सुर्यवंशी, तसेच मनपाचे अधिकारी कर्मचारी, मनपा शाळा व इतर खाजगी शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद, शहरातील महाविद्यालयांचे प्राचार्य आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# विद्यार्थ्यांनी जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून चिकित्सक राहावे

## महापौर दीपमाला काळे यांचे प्रतिपादन; कमल राजाराम वाणी विद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**प्रगती शिक्षण मंडळ संचलित कमल राजाराम वाणी बालनिकेतन विद्यामंदिर व ललिता युवराज वाणी माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी जळगाव शहराच्या महापौर दीपमाला काळे यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले.**

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते थोर शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही.रमन व डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ. युवराज वाणी, सचिव गोवर्धन पाटील, शिक्षणतज्ज्ञ प्रा. ललिता वाणी, संचालक वंदन वाणी, माजी मुख्याध्यापिका शालिनी भंगाळे तसेच मुख्याध्यापक डॉ. रवींद्र माळी, नीलेश नाईक व ज्योती बिऱ्हाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महापौर दीपमाला काळे यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तक देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.



विद्यार्थ्यांची कल्पकता आणि सादरीकरण पाहून महापौर दीपमाला काळे यांनी त्यांचे कौतुक केले व भविष्यात शास्त्रज्ञ बनण्यासाठी जरूर प्रयत्न करावे, असे त्यांना सांगितले. इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी स्वयंपाक घरातील विज्ञान ही नाटिका सादर करून विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी जो है जैसा है वैसा क्यू है हे गीत सादर केले. इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार केल्या होत्या. त्याचे उद्घाटन महापौरांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिक लिफ्ट, कुलर, ऑटोमॅटिक सॅनिटायझर मशीन, न्यूटनचे नियम आणि आम्ल-आम्लारी ओळख अशा विविध प्रयोगांचे थेट सादरीकरण केले. तसेच वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेतूनही आपली कला जोपासली.

महापौरांनी मार्गदर्शन करीत आपल्या भाषणात महापौर दीपमाला काळे म्हणाल्या की, आजचे युग हे विज्ञानाचे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेत गुण मिळवण्यासाठी न धावता कल्पक निर्मितीसाठी देखील प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक घटनेमागील कार्यकारणभाव शोधला पाहिजे. अंधश्रद्धेला थारा न देता विज्ञानाची कास धरली तरच आपला आणि देशाचा विकास होईल,असेदेखील तत्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या कल्पक प्रयोगांचे त्यांनी विशेष कौतुक केले. नियोजन व आभार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना नेहेते व सुवर्णा पोतदार यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन उज्ज्वला जाधव यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



## थोडक्यात

### मणियार महाविद्यालयात पथनाट्य स्पर्धांचे सादरीकरण

**जळगाव ।** एस. एस. मणियार विधी महाविद्यालय येथे हिंद-दी-चादर गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त पथनाट्य व पोस्टर सादरीकरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लॉ बुक हाऊसचे संचालक सुरेश शेट्टी, गुरुद्वाराचे अध्यक्ष हरजीतसिंग बवरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी होते.

### प्राध्यापकांसाठी आरोग्य विमा विषयक विकास संवाद

**जळगाव ।** नॅक क्रायटेरिया-६ अंतर्गत आरोग्य विम्याची आवश्यकता आणि आरोग्य विम्यात घ्यावयाची काळजी या विषयावर एक दिवसीय प्राध्यापक विकास संवाद कार्यक्रम डॉ.अक्षता पाटील हॉलमध्ये झाला. या सत्रात युवराज महाजन,हितेश पवार यांनी केले. त्यांनी आरोग्य विम्याचे महत्त्व, विविध प्रकार, कव्हरेजचे फायदे, दावे कसे करावेत. तसेच आरोग्य विमा पॉलिसी निवडताना आणि ती हाताळताना कोणती काळजी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र व कला व मानव्यविद्या प्रशाळेच्या भारतीय ज्ञान परंपरा केंद्रातर्फे इंडियन नॉलेज सिस्टीम अँड इट्स ग्लोबल इम्पॅक्ट या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद दि. ४ व ५ मार्च रोजी विद्यापीठाच्या पर्यावरण प्रशाळेच्या सभागृहात पार पडणार आहे.**

परिषदेचे उद्घाटन दि. ४ मार्च रोजी सकाळी १० वाजता होणार असून भारतीय ज्ञान परंपरेचे अभ्यासक आचार्य श्रेयस कुडेकर हे बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा. प्रकाश पाठक, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांची उपस्थिती लाभणार आहे. अधिक माहितीसाठी परिषदेच्या निमंत्रक डॉ. वीणा महाजन,सचिव डॉ.तुषार रायसिंग यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. राम भावसार यांनी केले आहे.

## चोपडा येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । चोपडा

**पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.**

यावेळी इयत्ता आठवी ब मधील हर्षदा वराडे हिने मनोगत व्यक्त केले. तसेच इयत्ता आठवी क मधील गौरी जाधव या विद्यार्थिनीनेही आपले विचार मांडले. इयत्ता आठवी क मधील प्राची पाटील हिने सुंदर काव्यवाचन केले.



इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनींनी सामूहिक कविता गायन सादर करून वातावरण भारावून टाकले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी खोप्यामधी खोपा या गीतावर आकर्षक नृत्य सादर केले. यावेळी शिक्षक बी.एम.तायडे यांनी आपल्या मनोगतात प्रत्येकाला मराठी भाषेचा अभिमान असला पाहिजे, असे प्रतिपादन केले. तसेच आर. के. माने यांनी मराठी भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी शामकांत पाटील व खुशी दाभाडे या विद्यार्थिनींनी उत्तम प्रकारे केले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी विविध साहित्यिकांवर आधारित आकर्षक भित्तीपत्रके तयार करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इयत्ता आठवीची कोमल पाठक हिने केले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. आर. पाटील, विजया पाटील, पौर्णिमा भादले, विनोद जाधव तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## अमृतासम मराठी भाषेचे संवर्धन करणे काळाची गरज : प्राचार्य डॉ.सोनवणे

प्रतिनिधी । चोपडा

**मराठी भाषा जीवन जगायला शिकविते. सुसंस्काराचे धडे व व्यक्तिमत्व घडविणारी मराठी भाषा खऱ्या अर्थाने ज्ञानपीठ आहे. या अमृतासम भाषेचे जतन व संवर्धन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य प्रा.डॉ.के. एन.सोनवणे यांनी केले.**

महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे दि.२७ फेब्रुवारी रोजी जागतिक मराठी राजभाषा गौरव दिन व कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित काव्यवाचन तसेच मराठी विभागातर्फे



आयोजित विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.के.एन.सोनवणे हे उपस्थित होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.डॉ. आर.एम.बागुल, समन्वयक डॉ.एस.ए.वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी.एस. पाडवी, पर्यवेक्षक ए.एन.बोरसे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका संदीप पाटील यांनी प्रास्ताविकेद्वारे स्पष्ट केली. यावेळी कार्यक्रमास आलेल्या मान्यवरांचे स्वागत कु.भावना कोळी या विद्यार्थिनीने गायलेल्या सुरेल स्वागत गीताने करण्यात आली. याप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या सुप्रसिद्ध कवितांचे काव्यवाचन करण्यात आले. यात अनुष्का अहिरे- कणा, भावना कोळी-माय मराठी, तृप्ती पाटील- कोकिळा या विद्यार्थिनींनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कवितांचे सादरीकरण केले. गंगा करंकाळे, जागृती बारी व कविता माळी यांनी मनोगत व्यक्त केले. शुद्धलेखन स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा अशा एकूण २४ विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचलन निवृत्ती पाटील व मोहिनी राजपूत यांनी केले तर आभार पुष्पा दाभाडे यांनी मानले.

## अमळनेर पोलिसांनी दाखविले माणुसकीचे दर्शन

### न बोलका बाळास नातलगांना हुडकून दिले ताब्यात



प्रतिनिधी । अमळनेर

**येथील शहर पोलिसांनी एका लहान बाळाला अवघ्या दोन तासात नातेवाईकांकडे सुपूर्द करून माणुसकीचे दर्शन घडवले आहे. हा बालक बस स्थानकावर आई-वडिलांपासून अचानक ताटातूट होऊन रडत असल्याचे पाहून पोलिसांनी धाव घेत पालकांना हुडकून काढत नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याने नागरिकांनी पोलिसांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे.**

बस स्थानकावर एक मुलगा रडताना आढळून आला. त्याला नीट बोलताही येत नव्हत. त्यास ताब्यात घेऊन पोहवा सुनील तेली, पोना सूर्यकांत साळुंखे, पोकॉ. मंगल भोई, अशोक कुमावत, नम्रता जरे अशांनी आपआपले परीने कार्तिकच्या कुटुंबीयांचा शोध घेण्याचा प्रयत्न करून सोशल मीडियाचा आधार घेऊन त्याच्याबाबत माहिती प्रसारित केली. त्यानंतर काही वेळाने सोशल मीडियावरून त्यांचे नाव कार्तिक उर्फ भावेश किशोर भिल्ल (वय तीन वर्षे, रा.नारणे, ता. धरणगाव जि.जळगाव) असे आढळून आले. पोलिसांनी पुढील माहिती घेत कुटुंबीयांशी संपर्क करून दोन तासांमध्ये त्याचे नातेवाईकांचा शोध त्यांच्या ताब्यात दिले. त्याचे काका ज्ञानेश्वर पांडुरंग भील, ( रा.नारणे ता. धरणगाव) यांच्याकडे इतर नातेवाईकांना समक्ष पोलीस स्टेशनला बोलावून मुलगा कार्तिक यास ताब्यात दिले.

## बायोकेमिस्ट्री विभागात प्रश्नमंजुषा, वैज्ञानिक खजिना शोध स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**मुळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव येथील बायोकेमिस्ट्री (जैवरसायनशास्त्र) विभागातर्फे दि.२७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन तसेच आंतरराष्ट्रीय प्रोटीन दिन यांच्या औचित्याने प्रश्नमंजुषा स्पर्धेसोबतच वैज्ञानिक सूचनांवर आधारित शोधमोहीम या आगळ्या वेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमाचे नियोजन बी.एस्सी. प्रथम वर्षातील विद्यार्थी राजेश प्रजापत, प्रथमेश पाटील, भुवनेश चौधरी, गौरी हलपतराव, अस्मिता तायडे आणि तृषा पाटील यांनी केले. कार्यक्रमाची अंमलबजावणी विभागप्रमुख डॉ. भूषण कविमंडन प्रा.डॉ.सुरेश कांबळे, डॉ. किशोर पाटील, डॉ.विपुल फालक फाळक, डॉ. उमेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्पर्धेमध्ये विजयी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

## बहिणाबाई विद्यालयाने नैसर्गिक पर्यायाचा केला निर्धार

प्रतिनिधी । जळगाव

**होळी आणि रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर बहिणाबाई विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेनेचे पर्यावरण प्रेमी विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंग बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. या रंगोत्सवात नैसर्गिक पर्याय पुढे आणण्याचा निर्धार केला.**

यावेळी समन्वयक प्रतिभा खडके, राजेश वाणी, विशाल पाटील, स्वाती कोल्हे, डॉ. प्रतिभा राणे, सीमा चौधरी, अजय कुवर सहभागी होते. रंगाचा हा सण उत्साह आनंद आणि मैत्रीचे प्रतीक असला तरी या सणाच्या निमित्ताने वापरल्या जाणाऱ्या बाजारातील रासायनिक रंगामुळे त्वचा, डोळे आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असतात. हे चित्र दरवर्षी पाहायला मिळतो. याच पार्श्वभूमीवर शहरातील बहिणाबाई विद्यालय व पवन चॅरिटेबल व अर्पण सेवा ट्रस्ट यांनी पुढाकार घेऊन नैसर्गिक रंग बनविण्याची कार्यशाळा घेतली. सदरील रंग जैवविघटनशील असल्यामुळे पर्यावरण पूरक ठरतात ही बाब लक्षात घेऊन डॉ.विलास नारखेडे यांनी नैसर्गिक पर्याय म्हणून हे रंग पुढे आणण्याचा निर्धार केला आहे.



या कार्यशाळेत झेंडू, शेवंती, पलाश, बीट, हळद, पालक, मेथी, पळस यासारख्या नैसर्गिक घटकांपासून रंग तयार करण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष १८७ विद्यार्थ्यांना शिकवण्यात आली.

# फैजपूरच्या खंडोबा यात्रेला उद्यापासून प्रारंभ

## येळकोट येळकोट जय मल्हारच्या गजरात राहणार भक्तांची गर्दी; ९ मार्चपर्यंत चालणार यात्रा महोत्सव

प्रतिनिधी । फैजपूर

**प्रति जेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फैजपूर येथील खंडोबा यात्रा महोत्सवाला २ मार्च रोजी होळीपासून सुरुवात होत असून ९ मार्चपर्यंत यात्रा सुरू राहणार आहे, अशी माहिती खंडोबा देवस्थानचे महामंडलेश्वर पुरुषोत्तमदास महाराज व उत्तराधिकारी महामंडलेश्वर पवनदास महाराज यांनी दिली.**



बसस्थानक रोडलगत असलेल्या खंडोबा गेटपासून यात्रेला प्रारंभ होतो. बसस्थानकाजवळील खंडोबा दरवाज्यापासून ते मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत विविध प्रकारची दुकाने थाटली जातात. दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र, मध्य प्रदेश व गुजरात येथून हजारो भाविक दर्शनासाठी दाखल होणार आहेत. २ मार्च रोजी सकाळी पारंपरिक पद्धतीने खंडोबा पूजन व अभिषेक होईल. त्यानंतर होळी प्रज्वलनाने यात्रेला औपचारिक सुरुवात होईल. यात्रा काळात भक्तांच्या सोयीसाठी पालिकेकडून स्वच्छता मोहीम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व आरोग्य पथक तैनात कंपनीकडून तात्पुरत्या दुकानांना वीजपुरवठा करण्यात येईल. पोलीस प्रशासनाकडून कायदा-सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण व वाहनतळाची व्यवस्था करण्यात येणार आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर मोताळे यांनी महिलांनी दागदागिने न आणण्याचे आवाहन केले असून, लहान मुलांना सोबत आणताना विशेष काळजी घ्यावी, असेही सांगितले आहे. परिवहन विभागाकडून यात्रेनिमित्त अतिरिक्त बससेवा उपलब्ध केली जाणार आहे. येळकोट येळकोट जय मल्हारच्या गजरात आणि भंडाऱ्याच्या उधळणीत भक्तगण नवस पूर्ण करण्यासाठी मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात. दररोज सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते खंडोबाची महाआरती करण्यात येणार आहे.



परंपरेनुसार मुख्य दरवाज्याजवळ रेवडीची दुकाने लागतात. तसेच पाळणे, रसवंती, भांड्यांची दुकाने, खेळणी, मौत का कुआ आदी आकर्षणे यात्रेची शोभा वाढवतात.

# दैनंदिन जीवनामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा



## इनरव्हील क्लब न्यू जेन अध्यक्ष मास्टर मुनिरा यांचा विद्यार्थ्यांना संदेश

प्रतिनिधी । जळगाव

**येथील लीटिल चॅम्प प्री-प्रायमरी स्कूल, मेहरूण, जय दुर्गा प्राथमिक माध्यमिक व कै. कौतिक चावदस महाजन उच्च माध्यमिक विद्यालय, मेहरुण. येथे दि.२८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच दैनंदिन जीवनामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा, असा संदेश इनरव्हील क्लब न्यू जेन अध्यक्ष मास्टर मुनिरा यांनी विद्यार्थ्यांना दिला.**

नोबल पारितोषिक प्राप्त शास्त्रज्ञ सी.व्ही. रामण यांच्या प्रतिमेचे पूजन इनरव्हील क्लब न्यू जेन अध्यक्ष मास्टर मुनिरा तसेच सेक्रेटरी मिसेस इशिता दोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी प्राथमिक विद्यालयाचे मुख्यध्यापक सागर कोल्हे, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. दीपक तळले, विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका सविता लोखंडे यांची उपस्थिती लाभली होती.

**• विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित विविध प्रयोगांची विद्यार्थीनींनी दिली माहिती**

यावेळी विद्यालयातील रोहित पाटील, डिंपल वंजारे, गुंजन हटकर, समर्थ ठाकरे, मीनाक्षी ट्विंकल इंगळे, जयश्री जाधव, कोमल निकम, धीरज चव्हाण, भावेश पोतदार, अश्विनी चौधरी, दीक्षा वाघ आदी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासला व अंगीकृत केला. याप्रसंगी विद्यालयातील विज्ञान शिक्षिका नलिनी नेटके व सविता लोखंडे यांनी सी.व्ही. रामण यांचे वैज्ञानिक संशोधन कार्याविषयी तसेच विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित विविध प्रयोगांची माहिती दिली. न्यू इनरविल क्लब जळगावतर्फे मास्टर मुनिरा आणि मिसेस इशिता दोशी यांच्यातर्फे विद्यालयाला इलेक्ट्रॉनिक सूक्ष्मदर्शिका (मायक्रोस्कोप) भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनल आहिरे व अश्विनी चौधरी हिने तर आभार सविता लोखंडे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रकाश किरणांचे परिवर्तन अपवर्तन, अपस्करण या घटनांचा परिणाम व निसर्गातील विविध घटना विद्यार्थ्यांनी विविध छोट्या प्रकिया आपल्या प्रयोगातून सादरीकरण व स्पष्टीकरण केले.



## थोडक्यात

### स्वा.सावरकरांची पुण्यतिथी धार्मिक वातावरणात संपन्न

**भुसावळ ।** येथील स्वा. सावरकर मध्यवर्ती राष्ट्रीय प्रबोधन संस्था व परिभ्रमण त्रिपदी मंडळ तसेच सकल हिंदू समिती आणि ब्राह्मण संघ या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने स्वा. सावरकरांची ६० वी पुण्यतिथी त्रिपदीच्या सुश्राव्य श्री दत्त भजनांनी कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्व प्रथम सावरकर संस्थेचे सचिव गणेश वढवेकर यांनी जामनेर रोड वरील सावरकर चौकात सावरकरांच्या प्रतिमेला व फलकाला माल्यार्पण केले. यानंतर त्रिपदी मंडळाच्या वतीने भजन व नामस्मरण झाले. वंदेमातरम या राष्ट्रगीताला १५० वर्ष व सागरा प्राण तळमळला या गीताला ११५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त दोन्ही गीतांचे सादरीकरण झाले. यावेळी महेश फालक, माधवी संत, महेंद्र गोडबोले,निर्मल कोठारी, सरिता देशपांडे, रविंद्र जोशी व दत्तभक्त आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### फेकरी शाळेमध्ये शालेय साहित्य वाटप

**भुसावळ ।** तालुक्यातील फेकरी येथील जिल्हा परिषद शाळा आणि उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज उत्सव समितीतर्फे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आदित्य पाटील, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव कमलेश बऱ्हाटे, सहसचिव आकाश बोरोले, आणि सल्लागार गजानन पाटील यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी सचिन पाटील, नसीर शहा, चंद्रकांत सदाशिव सूर्यवंशी, प्रियंका अशोक कांबळे, शेख आरिफ समद, अमोल टेकाडे, गणेश भारंबे, वैजनाथ कुलकर्णी, चेतन तायडे, हर्षल निकम, कुणाल पाटील, उदय बऱ्हाटे, चेतन सोनवणे, संकेत झाल्टे, प्रेम भटकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## पंकज महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बापू डेअरीला भेट

प्रतिनिधी । चोपडा




**पंकज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चोपडा येथील रसायनशास्त्र विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी नोकरी पूर्व प्रशिक्षण (ओजेटी) अंतर्गत दि.२७ फेब्रुवारी रोजी यावलरोड, चोपडा येथील बापू डेअरी प्रॉडसर कंपनीला भेट दिली व प्रत्येक विभागातील प्रोसेसिंग, टेस्टिंग लॅब आणि पॅकिंग संदर्भात माहिती विद्यार्थ्यांनी माहिती करून घेतली.**

यासंदर्भात मार्गदर्शन करताना कर्मचारी वृंद सोबत महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर. अत्तरदे, कंपनीचे मालक बापू माळी व कर्मचारीवृंद यांचे सहकार्य लाभले.

## भांड्यासाठी उसळली कमल जिनिंगवर कामगारांची गर्दी



प्रतिनिधी । धरणगाव

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी इमारत व इतर बांधकाम कामगारांनी हजारोंच्या संख्येने येथे गर्दी केली. सकाळपासूनच अर्ज दाखल करण्यासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सायंकाळपर्यंत परिसरात जणू एखाद्या यात्रेचा माहोल निर्माण झाला होता. येथील कमल जिनिंग परिसर अक्षरशः गजबजून गेला.**

मंडळाकडून देण्यात येणाऱ्या गृहपयोगी साहित्य संच योजनेसह इतर लाभांसाठी अर्ज स्वीकृती प्रक्रिया राबविण्यात आली. धरणगाव शहरासह, तालुक्यातील तसेच ग्रामीण भागातील कामगार मोठ्या आशेने येथे दाखल झाले होते. अनेकांनी लवकर नंबर मिळावा म्हणून पहाटेपासूनच हजेरी लावली होती. कमल जिनिंगच्या आवारात तात्पुरते काउंटर उभारण्यात आले होते. कामगारांच्या ओळखपत्रांची तपासणी, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी तसेच बायोमेट्रिक नोंदणीची प्रक्रिया सुरू होती. शिस्तबद्ध पद्धतीने रांगेत उभे राहून कामगारांनी सहकार्य केले. याप्रसंगी ठेवण्यात आलेले स्टील भांड्यांचे संच, ट्रंक, पाण्याचे कॅन, पेटी, आदी साहित्य पाहून कामगारांमध्ये उत्सुकता दिसून येत होती. शासनाकडून मिळणारा हा आधार आमच्यासाठी मोठा आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. महिला कामगारांची उपस्थिती विशेष लक्ष वेधणारी होती. अर्ज दाखल करण्यासाठी आलेल्या कामगारांना मदतनीस म्हणून दिपक पाटील, हर्षल महाले, निलेश महाले, लकी भाटिया व योगेश कुंभार यांनी कागदपत्रे तपासणे, फॉर्म भरण्यास मार्गदर्शन करणे व रांगेचे नियोजन करण्यासाठी विशेष सहकार्य केले. त्यांच्या मदतीमुळे अनेक कामगारांना प्रक्रिया सुलभ झाली. गर्दी मोठ्या प्रमाणावर झाल्याने काही वेळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.

## निंभोरामध्ये संत गाडगे महाराज जयंती साजरी

प्रतिनिधी । भुसावळ

तालुक्यातील निंभोरा बुद्रुक येथील त्रिरत्न बुद्ध विहार येथे राष्ट्रीय संत संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान परिसराची स्वच्छता करून उपस्थितांनी संतांना अभिवादन केले. यावेळी लताबाई तायडे, मिरा नरवाडे, दिनेश इखारे, रमेश खंडारे आणि संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रकाश सरदार उपस्थित होते.

# थेट रस्त्यावर उतरून समस्यांचा निपटारा

## नगराध्यक्षांचा चोपडा शहरात पायी दौरा; नागरिकांशी संवाद साधून जाणून घेतल्या समस्या

प्रतिनिधी । चोपडा



**शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि स्वच्छतेसाठी लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांनी गुरुवारी शहराच्या विविध भागात पायी दौरा केला. केवळ कागदोपत्री कामापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर देत, त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.**

शहरातील प्रमुख मार्ग असलेल्या श्री शनि मंदिर परिसराला लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी भेट दिली. त्यानंतर बोहरागल्ली, आझाद चौक, भाजी मार्केट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, मेनरोड (गुरुदत्त ज्वेलर्स परिसर) आदी भागात भेट देवून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात सांगता करण्यात आली. या पाहणी दौऱ्यादरम्यान नगराध्यक्षांनी खालील बाबींची बारकाईने पाहणी केली. यात स्वच्छता, रस्त्यांची साफसफाई आणि कचरा संकलनाची सद्यस्थिती तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि बंद पडलेले पथदिवे संदर्भात माहिती जाणून घेतली. तुंबलेल्या नाल्यांची तक्रार येताच अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाहीचे आदेश देत नालेसफाई करण्याच्या सूचना दिल्या.या पाहणीदौऱ्यात स्वच्छता निरीक्षक जयेश भोंगे, दीपाली साळुंखे, निलेश कोळी, सुनील बाविस्कर यांच्यासह स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाहणीनंतर चोपडा शहरात तातडीने स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे. शहरामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध श्रमदान मोहीमद्वारे शहरात स्वच्छता करण्यात येणार आहे.

> **आम्ही दिलेला शब्द पाळत आहोत, आता काम प्रत्यक्ष रस्त्यावर दिसेल. प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास चोपडा शहर नक्कीच स्वच्छ होईल.**
> **- नम्रता पाटील**
> लोकनियुक्त नगराध्यक्षा, चोपडा



### ➤ प्लास्टिक बंदीच्या कडक सूचना

शहरातील बाजारपेठेत प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत कडक सूचना देण्यात आल्या. नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना देखील याविषयी आवाहन केले आहे. नगराध्यक्षांनी स्वच्छ आणि सुंदर चोपडा घडवण्यासाठी जनतेला काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. तसेच दुकानदार आणि फेरीवाल्यांनी कचरा रस्त्यावर न टाकता स्वतःकडे डस्टबिन ठेवावे. घरातील किंवा दुकानातील कचरा केवळ घंटागाडीतच टाकावा. कचऱ्याची विल्हेवाट लावणे ही केवळ प्रशासनाचीच नाही, तर नागरिकांचीही जबाबदारी आहे, अशा सूचना लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी दिल्या.

### चोपडा नगरपरिषदेचा दणका! २९ लाखांची तात्काळ वसुली; ७ दिवसांत थकबाकी भरा अन्यथा कठोर कारवाई

# ३० गाळ्यांना सील, ८० मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन कट

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषदेने आज सकाळी सहा वाजेपासून थकीत कर व गाळे भाडेधारकांवर मोठी कारवाई सुरू केली. महाराणा प्रताप, आंबेडक समाज मंदिर, राजीव गांधी, महात्मा गांधी, आठवडे बाजार ए, बी, सी व डी या नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्समधील कर व भाडे थकित असलेल्या गाळ्यांवर सील लावण्यात आले.**

आजच्या कारवाईत सुमारे ३० नगरपरिषदेच्या गाळ्यांना सील ठोकण्यात आले. यानंतर कारवाईचा दुसरा टप्पा राबवित गौतम नगर, मल्हारपुरा, चिंच चौक आदी भागातील सुमारे ८० थकित मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन तात्काळ बंद करण्यात आले. या कठोर कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून आजच सुमारे ९ लाख रुपयांची थकबाकी वसूल करण्यात आली आहे. घरासमोर वाजंत्री वाजविणे, सामानाची जप्ती, वर्तमानपत्रात नाव प्रसिद्ध करणे, मालमत्तेवर बोजा बसविणे, चौकाचौकात बॅनरवर थकबाकीदार म्हणून नाव जाहीर करणे, रिक्षावर माईकद्वारे नाव जाहीर करणे, नळ कनेक्शन बंद करणे, दुकानांना सील लावणे अशी थकबाकीदारांविरुद्ध मोहिम राबविण्यात येणार आहेत.

### ➤ सात दिवसांची अंतिम मुदत



नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील सर्व नागरिकांनी थकित मालमत्ता कर, नळपट्टी व दुकान भाडे येत्या सात दिवसांत भरावे. अन्यथा पुढील कठोर कारवाई अटळ आहे.

**फोनचा पाऊस, मुदतीची मागणी**

दहा वाजेनंतर नळ कनेक्शन बंद झालेल्या व गाळ्यांना सील लागलेल्या थकबाकीदारांनी नगरपरिषदेकडे धाव घेत घरपट्टी, पाणीपट्टी व दुकान भाडे भरण्यासाठी गर्दी केली. काहींनी मुख्याधिकारी, लोकप्रतिनिधी, कर निरीक्षक व वसुली कारकून यांना फोन करून मोहीम थांबविण्याची तसेच काही दिवसांची मुदत देण्याची विनंती केली.



# धरणगाव तालुक्यात पडलेला मका परवडेना

## मकाचे भुकटे तोडून बेभावात विक्री

प्रतिनिधी । धरणगाव

धरणगाव शिवारासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे,पिंप्री, वाघळूद परिसरासह संपूर्ण तालुक्यात महिनाभरापूर्वी अचानक आलेल्या वादळ आणि पावसामुळे रब्बीची पिके भुईसपाट झाली होती. त्यामुळे बहुतेक शेतकरी वर्गाचा मका जमीनदोस्त झाला होता. काही शेतकऱ्यांनी पडलेला मका चारा कापणीसाठी देवून टाकला होता. परंतु, काही शेतकऱ्यांचा मका निसवणीला असल्याने त्यांनी मात्र हा मका तसाच राहू दिला होता.

पडलेला मका पक्का झाला असून आता मात्र मका काढण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे पडलेला मकाला काढण्यासाठी मजुरी परवडेनाशी झालेली आहे. बहुतेक शेतकरी मकाचे भुकटे तोडून बेभावात गुरांच्या चारासाठी कापणीला देवून टाकीत आहेत. आधीच देवाने पाठीवर मारले असून रब्बीला कमी भाव असल्यामुळे आता शेतकऱ्यांना पोटावर देखील मारले जात आहे. गळवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास जोरदार वादळ सुरू झाले. वादळासह जोरदार पाऊस सुरू झाला. वादळाचा जोर एवढा प्रचंड होता की गहू, मका, ज्वारी तसेच हरभरा भुईसपाट झाला. आधीच खरिपने पोटावर मारले. रब्बीवर खरीपचा खर्च निघेल, अशी आशा बळीराजाला लागून होती. परंतु,ही आशा देखील फोल ठरल्याने शेतकरी चिंतीत आहे.


